**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्रीपदाच्या तिसऱ्या कार्यकाळातल्या पहिल्या मन की बात मधून नरेंद्र मोदी यांचा जनतेशी संवाद / पर्यावरण दिनानिमित्त एक पेड़ माँ के नाम अभियानाची केली घोषणा

- नवे लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी स्वीकारला पदभार.

- तीन नवीन फौजदारी कायदे उद्यापासून देशभर लागू होणार

- गाझापट्टीत इस्रायलने गेल्या चोवीस तासात केलेल्या हल्ल्यात ४० पॅलेस्टिनींचा मृत्यू , २२४ जण जखमी

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तब्बल १७ वर्षांनी जिंकणाऱ्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत देशातल्या मतदारांनी संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवरच्या अढळ विश्वासाचं दर्शन घडवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात च्या एकशे अकराव्या भागात सांगितलं. तीन महिन्यांच्या कालावधीनंतर आपल्या तिसऱ्या कार्यकाळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रथमच आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे अकरावा भाग होता.

जगातली सर्वात मोठी सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पडल्याबद्दल त्यांनी निवडणूक यंत्रणा आणि मतदारांचं अभिनंदन केलं तसंच देशवासीयांचे

आभार मानले. या निवडणुकीत ६५ कोटी मतदारांनी मतदान केलं, असं कोणत्याही देशात घडलेलं नाही असं सांगून त्यांनी आपल्या निवडणूक प्रक्रियेचा गौरव केला.

धरतीमातेचं ऋण फेडण्यासाठी, यावर्षीच्या पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' ही मोहीम सुरू केली असल्याची माहिती त्यांनी दिली. या मोहीमेअंतर्गत भारतासह जगभरातल्या नागिकांनी आपल्या आईसोबत किंवा तिच्या नावानं एक झाड लावावं, या मोहिमेमुळे आपल्या आईचा सन्मान तर होईलच त्यासोबतच धरणी मातेचंही रक्षण होईल असं ते म्हणाले. सगळ्यांच्याच प्रयत्नांमुळे भारतात गेल्या दशकभरात वनक्षेत्राचा अभूतपूर्व विस्तार झाला, अमृत महोत्सव साजरा करताना देशभरात ६० हजारांपेक्षा जास्त अमृत सरोवरांची निर्मिती झाली, त्याचप्रमाणे या मोहिमेलाही आपण गती द्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

पॅरीसमध्ये पुढच्या महिन्यात होणार असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांनी भारतीय खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. टोकियो ऑलिम्पिकप्रमाणेच पॅरिसमध्येही आपले खेळाडू चांगली कामगिरी करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपण लवकरच या खेळाडूंना भेटून त्यांना प्रोत्साहन देणार आहोत, देशातल्या नागरिकांनीही चिअर फॉर भारत या हॅशटॅगचा वापर करत आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

आकाशवाणीच्या संस्कृत बातमीपत्राच्या प्रसारणाला आज ५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी आकाशवाणीचं अभिनंदन केलं. या भाषेच्या जतन संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांना हातभार लावायला हवा असं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड बाईट**

जगभरात भारतीय संस्कृती गौरवली जात असल्याचं सांगताना त्याबाबतची अनेक उदाहरणं त्यांनी आज श्रोत्यांसमोर मांडली. कुवेत सरकारनं त्यांच्या राष्ट्रीय

आकाशवाणीवर हिंदी भाषेतील विशेष कार्यक्रम सुरू केला असल्याची महिती दिली आणि त्याचा किंचितसा अंश श्रोत्यांना ऐकवला. तुर्कमेनिस्तानमध्ये उभारलेल्या जगभरातल्या २४ प्रसिद्ध

कवींच्या पुतळ्यांमधे, भारताचे महान कवी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचाही पुतळा असणं, ही सन्मानाची बाब असल्याचं ते म्हणाले. ५ जून रोजी सुरीनाम आणि सेंट व्हिन्सेंट अँड दि ग्रेनाडाइन्स ह्या दोन कॅरिबियन देशांमध्ये तिथला भारतीय वारसा साजरा करताना, भारतीय समुदाय आगमन दिवस जल्लोषात साजरा झाल्याची माहिती त्यांनी दिली.

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात जल्लोषात साजरा झाल्याचं सांगून ते म्हणाले की, दरवर्षी योगदिनाचे कार्यक्रम नवनवे विक्रम प्रस्थापित करत आहेत. अमेरिका, इजिप्त, म्यानमा, बहारीन, श्रीलंका, मार्शल बेटं, भूतान यांसह अनेक देशांमध्ये योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या अभिनव उपक्रमांविषयी सांगतांना, सौदी अरेबियात पहिल्यांदाच एका महिलेनं योगासनांच्या सूचना देण्याच्या घटनेचाही उल्लेख त्यांनी केला. देशातल्या नागरिकांनीही योगाभ्यासाचा सराव फक्त एका दिवसापुरता न करता, नियमितपणे योगासनं करावी, तरच आयुष्यात नक्कीच सकारात्मक बदल जाणवू लागतील असं ते म्हणाले.

देशातली स्थानिक उत्पादनं जागतिक पातळीवर पोहचवण्यासाठीच्या विविध प्रयत्नांची उदाहरणं त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. अशा उत्पादनांना जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी ती माय प्रॉडक्ट माय प्राईड हा हॅशटॅग वापरून शेअर करावी असं आवाहन त्यांनी केलं.

आदिवासी बांधव आजचा दिवस ‘हूल दिवस’ म्हणून साजरा करत असल्याची माहिती देत, प्रधानमंत्र्यांनी सिद्धो - कान्हू यांनी ब्रिटीश सरकारविरोधात दिलेल्या लढ्याचं स्मरण केलं.

लवकरच सुरु होणार असलेली जगन्नाथ यात्रा, तसंच अमरनाथ यात्रा आणि पंढरपूरच्या वारीत सहभागी होणाऱ्या भाविकांना प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या. तसंच आगामी कच्छी नववर्ष आणि आषाढी बीज सणाच्याही त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज भारताचे लष्करप्रमुख म्हणून नवी दिल्ली इथं पदभार स्वीकारला. लेफ्टनंट जनरल द्विवेदी यांनी १९८४ ला भारतीय लष्करातल्या सेवेला सुरुवात केली होती. आपल्या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी विवध पदांवर काम केलं आहे. उप लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती होण्याआधी त्यांनी पायदळाचे मुख्य संचालक तसंच जनरल ऑफीसर कमांड इन चीफ म्हणूनही काम केलं होतं. द्विवेदी यांना आतापर्यंत परम विशिष्ट सेवा पदक आणि अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता, आणि भारतीय साक्ष्य अधिनियम, हे नवे फौजदारी कायदे उद्यापासून देशभरात लागू होणार आहेत.नवीन कायद्यांबाबत न्यायाधीश, वकील यांच्यासह सर्व संबंधितांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीनं विधी आणि न्याय मंत्रालयाच्या विधी कार्य विभागातर्फे मुंबईत आज आयोजित एका परिषदेचं उद्घाटन केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं.

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कायदा आणि न्यायराज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, महाराष्ट्राचे विधी आणि न्यायव्यवस्था मंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई, गुजरात, पंजाब या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती, या तीन नवीन कायद्यांवर बोलणार आहेत.

<><><><><>

गाझापट्टीत इस्रायलने गेल्या चोवीस तासात केलेल्या हल्ल्यात ४० पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला असून २२४ जण जखमी झाले आहेत. इस्रायलने गाझाविरोधात युद्ध सुरू केल्यापासून आतापर्यंत पॅलेस्टाईनचे ३७ हजाराहून अधिक नागरिक मरण पावले असून ८६ हजारांहून अधिक नागरिक जखमी झाल्याचं गाझाच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. तर इस्रायली लष्कर गाझापट्टीतल्या शुजैया परिसरातल्या दहशतवादी तळांवर सातत्यानं हल्ले करत असल्याचं इस्रायली लष्कराचे प्रवक्ते अविचे अद्रेई यांनी सांगितलं.

<><><><><>

कार्बन उत्सर्जन कमी करून विकासाला गती देण्यासाठी जागतिक बँकेने भारताला दीडशे कोटी डॉलर्सची मदत मंजूर केली आहे. ग्रीन हायड्रोजन, इलेक्ट्रॉलायजर्स आणि नवीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन देणं हा यामागचा हेतू आहे. याआधी जून २०२३ मध्ये जागतिक बँकेने दीडशे कोटी डॉलरची मदत भारताला दिली होती. वाढीव निधीमुळे भारताला ग्रीन हायड्रोजन उत्पादन करायला आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्याला मदत होणार आहे. २०३० पर्यंत ५०० गिगवॅट नवीकरणीय ऊर्जा निर्मिती करण्याचं भारताचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तब्बल १७ वर्षांनी जिंकणाऱ्या भारतीय संघावर चहूकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भारताच्या या विजयानंतर देशभरात क्रिकेटप्रेमींच्या जल्लोषाला उधाण आलं होतं, मुंबई, चेन्नई, बंगळूरू, हैद्राबाद, दिल्ली या शहरांसह जागोजागी रस्त्यांवर तिरंगा फडकावत क्रिकेट प्रेमींनी विजयोत्सव साजरा केला.

भारतीय क्रिकेट संघाच्या या कामगिरीनं देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांचं हृदय जिंकलं अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे.
काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही संपूर्ण स्पर्धेत भारतानं केलेल्या गौरवास्पद कामगिरीबद्दल संघाचं अभिनंदन केलं आहे.
आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांनीही अखेरच्या चेंडू पर्यंत रंगलेला चित्तथरारक सामना जिंकल्याबद्दल भारताचं अभिनंदन केलं आहे.या खेरीज विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी भारताच्या विजयाबद्दल अभिनंदन केलं आहे.
स्पर्धेच्या काल वेस्टइंडिजमध्ये बार्बाडोस इथं झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत भारतानं विजेतेपदाला गवसणी घातली. राहुल द्रविड याचा भारताचे प्रशिक्षक म्हणून हा अखेरचा सामना होता. या सामन्यातल्या विजयानंतर, कर्णधार रोहीत शर्मा तसंच विराट कोहली यांनीही हा आपला अखेरचा टी ट्वेंटी सामना असल्याची घोषणा केली. त्यामुळे हे विश्वविजेतेपद या तिघांसाठी सन्माननीय निरोप ठरला आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यात आज भारताची स्नेहा राणा हिनं ८ गडी बाद करत इतिहास घडवला. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर हा सामना सुरू आहे. स्नेहाने आठ तर दीप्ती शर्माने दोन गडी बाद केले. आणि दक्षिण आफ्रिकेचा डाव २६६ धावात गुंडाळला. दक्षिण आफ्रिकेला फॉलोऑन मिळाला असून,

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १ बाद ८३ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**